**नियमित दिवाणी दावा क्र.४३/२०१५**
**देवराव ..*विरुध्द*.. शंकर**
**<u>निशाणी क्र.१४</u>**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ म्हणुन श्री.देवानंद देवराव राकेश यांची उलटतपासणी प्रतिवादींची अधिवक्ता श्री.व्ही.एम.क्षिरसागर यांच्या मार्फत शपथेवर सुरु</u>.**

१२. शिवराम राकेश हे माझे आजोबा असुन त्यांचे निधन सन २००९–२०१० दरम्यान झाले आहे. हे म्हणणे खरे आहे कि, माझी आजी नामे शेवंताबाई हिचे निधन दिनांक १९.०९.२०१९ रोजी झालेले आहे. माझ्या आजोबाला दोन मुलं व तिन मुली होत्या. हे म्हणणे खरे आहे कि, आशा रामचंद्र बारई, बेबी बालपांडे व प्रतिभा सरोदे हया माझ्या आजोबांच्या मुली आहेत. हे म्हणणे खरे नाही कि, मोवाड येथे माझ्या आजोबाचे कोणतेही वडीलोपार्जीत घर नव्हते. हे म्हणणे खरे नाही कि, आमचे मोवाड येथे वडीलोपार्जीत घर असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा मी अभिलेखावर दाखल केला नाही.

१३. हे म्हणणे खरे आहे कि, मोवाड येथे आमची वडीलोपार्जीत शेती सर्वे क्र.११३ आहे. हे म्हणणे खरे आहे कि, सदर शेती आजही माझ्या आजोबाच्या नावाने आहे. हे म्हणणे खरे आहे कि, माझ्या आजोबांच्या मृत्युनंतर माझे वडील व प्रतिवादी क्र.१ हे सदर शेताच्या संयुक्त ताब्यात आहेत. हे म्हणणे खरे नाही कि, माझ्या वडीलामध्ये व प्रतिवादी क्र.१ मध्ये घराची व शेताची वाटणी झाल्याबाबत मी माझ्या शपथपत्रात खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही कि, वाद घराचे माझ्यामध्ये व माझ्या भावामध्ये वाटणी झाल्याची बाब मी माझ्या शपथपत्रात खोटी नमुद केली आहे. हे म्हणणे खरे नाही कि, वाद घराच्या कागदपत्रांमध्ये माझ्या वडीलांनी त्यांच्या नावाचा बेकायदेशीर फेरफार घेतलेला होता. हे म्हणणे खरे नाही कि, वाद घरामध्ये माझ्या वडीलांचा समान हिस्सा आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही कि, वाटणीप्रमाणे वाद घराच्या पश्चीमेकडील हिस्स्यात आमचा ताबा असल्याचे मी खोटे सांगत आहे.

१४. हे म्हणणे खरे आहे कि, माझे मारुड या गावी घर आहे. हे म्हणणे खरे नाही

कि, सदर मारुड येथील घर माझ्या वडीलांनी त्यांच्या एकत्रीत कुटुंबाच्या उत्पन्नातुन विकत घेतले आहे. हे म्हणणे खरे आहे कि, वाद घर हे माझ्या आजोबांना पुनर्वसन योजनेत मिळाले होते. हे म्हणणे खरे नाही कि, त्यामुळे वाद घर हे माझ्या आजोबाचे स्वर्जीत घर होते. हे म्हणणे खरे आहे कि, माझ्या आजोबाने त्यांच्या जिवनकाळात वाद घराची हिस्से वाटणी करुन दिली होती. हे म्हणणे खरे नाही कि, सदर वाटणीप्रमाणे माझ्या आजोबाने मारुड येथील घर माझ्या वडीलांना तर वाद घर हे प्रतिवादी क्र.१ ला दिले होते. साक्षिदार स्वताहुन सांगतो कि मारुड येथील घर हे माझ्या आईच्या वडीलांनी माझ्या आईच्या नावे नोंदणीकृत विक्रीपत्रान्वये विकत घेउन दिले होते. हे म्हणणे खरे नाही कि, मारुड येथील घर माझ्या आईच्या वडीलांनी नोंदणीकृत विक्रीपत्रान्वये माझ्या आईच्या नावे विकत घेतल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही कि, मारुड येथील घर माझ्या आईच्या नावाने विकत घेतल्याबाबतचे कोणतेही कागदपत्र मी अभिलेखावर दाखल केले नाही. ,

१५. हे म्हणणे खरे नाही कि, माझ्या आजोबाने दिनांक १२.०४.२००१ रोजी मृत्युपत्र करुन ठेवले होते. हे म्हणणे खरे नाही कि, सदर मृत्युपत्रानुसार वादातील घर हे प्रतिवादी क्र.१ ला दिले होते. हे म्हणणे खरे नाही कि, मागील २० ते २५ वर्षांपासुन वाद घर हे पूर्णपणे प्रतिवादी क्र.१ च्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही कि, सदर दावा दाखल करेपर्यंत आम्ही वाद घराच्या वाटणीची मागणी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे कि, मी सदर दाव्यामध्ये माझ्या वडीलांच्या बहीणींना पक्षकार केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे कि, आम्ही सदर दाव्यामध्ये शेतीच्या वाटणीची मागणी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही कि, वाद घर बळकाविण्याच्या दृष्टीने मी सदर खोटा दावा दाखल कोला. हे म्हणणे खरे नाही कि, मी माझ्या पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले असुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटसरतपास संपला.</u>**

**<u>फेरतपास काही नाही</u>**

सा. वा. दा. अ. ब. अ. क.केले

समक्ष

(पी. आर. पाटील)
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
नरखेड, जि. नागपूर
दिनांक–०५.११.२०२४

(पी. आर. पाटील )
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
नरखेड, जि. नागपूर

## <u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते कि पुराव्याच्या सदर पि.डी.एफ. फाईलमधील मजकुर हा पुराव्याच्या मुळ प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

**लघुलेखकाचे नाव**– अ.य.कुळकर्णी (श्रेणी–३)